लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ८६२५०५०१११/८६२५००५१११

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com

पाहिजेत
पत्रकार, व्हिडीओ एडिटर, स्वागतिका, टेली मार्केटिंग, मार्केटिंग प्रतिनिधी पाहिजेत. पगार 5 ते 25 हजार, शिकावूंसाठीही संधी, कागदपत्रासह भेटा
फोन- 9657069069, 0217-3550592
पत्ता:- F-3 वृंदावन पार्क, होटगी रोड सोलापूर

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १८ वे, अंक २३० वा | बुधवार, दि. २४ एप्रिल २०२४ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# राष्ट्रवादी बालेकिल्ल्यातून लीड मिळवण्याचा भाजपचा डाव

# विधानसभेपूर्वी भाजपाला सुरुंग लावण्याचा शरद पवारांचा नवा घाव

## संजय क्षीरसागर यांच्या प्रवेशामुळे समीकरणात बदल

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने मोहोळ शहर आणि संपूर्ण तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच ढवळून निघत आहे लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये इन्कमिंग आउटगोइंग चे चांगलेच सत्र सुरू झाल्याचे स्पष्टपणे जाणवत आहे. मोहोळ विधानसभा मतदारसंघातील भाजपाचे नेते लोकसेवक संजयअण्णा क्षीरसागर हे आज महाविकास आघाडीचे आधारवड, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते शरदचंद्र पवार यांच्या उपस्थितीत मोहोळ येथे आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी शरद पवार गटामध्ये प्रवेश करणार असल्याच्या वृत्ताने मोहोळ तालुक्याच्या राजकीय वतुर्ळात एकच खळबळ उडाली आहे. संजय क्षीरसागर यांनी दहा वर्षांपूर्वी विधानसभेची निवडणूक लढवली होती राष्ट्रवादीचे तत्कालीन उमेदवार रमेश कदम यांच्याकडून त्यांनी साडेसहा हजार मतांनी पराभव पत्करला होता. नंतरच्या काळात नगरपरिषद निवडणुकीत त्यांच्या परिवारातील सदस्याला पराभवाला





सामोरे जावे लागत असले तरी एकेकाळी गोपीनाथ मुंडे यांचे निकटवर्तीय समर्थक असलेल्या क्षीरसागर यांनी वर्षभरापूर्वी पंकजा मुंडे यांची भव्य मिरवणूक काढून त्यांचा सत्कार केला होता.

क्षीरसागर यांच्या प्रवेशाच्या वातावरणाचा मोठा फायदा घेण्याचा प्रयत्न काँग्रेसने राष्ट्रवादीच्या माध्यमातून केला आहे.मराठा आरक्षणाबद्दलची नाराजी, शेतकऱ्यांचे प्रश्न सत्ताधाऱ्यांमध्ये नसलेला समन्वय या कच्च्या दुव्यांचा परफेक्ट अभ्यास करून उमेदवार प्रणितीताई शिंदे यांनी मोहोळ तालुक्यातील अनेक गावांना भेटी देण्याचा सपाटा सुरू केला आहे. त्यांनी सर्वसामान्यांच्या अडचणी व्यथा त्यांच्या समवेत बसून जाणून घेतल्यामुळे त्यांची पॉलिटिकल कनेक्टिव्हिटी वाढत असल्याचे जाणवत आहे. भाजप महायुतीच्या प्रचारात दिवसा असलेली काही मंडळी रात्री मात्र प्रणिती शिंदेंना मताधिक्य मिळणार असल्याच्या पैजा लावत असल्यामुळे नक्की कोण कोणाला मत देणार ? हे सहज समजणे सध्या तरी शक्य नाही. मात्र राष्ट्रवादीचा बालेकिल्ला असलेल्या मतदारसंघात राम सातपुते यांना मोठे मताधिक्य देण्याचा स्पष्ट शब्द राजन पाटील यांनी पक्षश्रेष्ठ समोर दिल्यामुळे या मतदारसंघातून भाजपाला मताधिक्य मिळणारच असा विश्वास राष्ट्रवादी भाजपा आणि शिंदे सेनेच्या पदाधिकाऱ्यांना वाटत आहे.

सध्या अजितदादा राष्ट्रवादी ही भाजपा समवेत आहे. त्यामुळे



भाजपाचे उमेदवार राम सातपुते यांच्या प्रचारार्थ स्वतः माजी आमदार राजन पाटील यांनी पुढाकार घेतला असून त्यांचे दोन्ही सुपुत्र बाळराजे आणि अजिंक्यराणा पाटील हे मोठ्या ताकतीने प्रचारात उतरले आहेत. बारामती लोकसभा मतदारसंघातील काही भागांची जबाबदारी मोहोळचे आ.यशवंत माने यांच्याकडे असल्यामुळे ते ते बारामती लोकसभा मतदारसंघातील प्रचाराची जबाबदारी उरकून मोहोळ मतदारसंघातील प्रचार दौऱ्यामध्येही सहभागी होत आहेत. एक तर शब्द द्यायचा नाही आणि दिला तर तो कोणत्याही परिस्थितीत पाळायचा असा स्वभाव असलेल्या राजन पाटील यांनी आमदार सातपुते यांच्या समवेत मतदारसंघाच्या बऱ्याच भागात दौरा करून प्रचार बैठका घेऊन मताधिक्य देण्यासाठी महायुतीचा धर्म पाळण्यावर भर दिला आहे.राष्ट्रवादीने या प्रचार दौऱ्यामध्ये मोठी आघाडी घेऊन भाजपाच्या खांद्याला खांदा लावून प्रचार सुरू केला आहे. भाजपाच्या वतीने खा.धनंजय महाडिक यांनी भीमा परिवाराची बैठक घेऊन महायुतीच्या उमेदवाराला मोठे मताधिक्य देण्याचा शब्द सातपुतेंना दिला जि प चे माजी सभापती विजयराज डोंगरे मोहोळ भाजीपाचे युवा नेते सुशील क्षीरसागर यांनीही प्रचारामध्ये सक्रिय सहभाग नोंदवून भाजपाला (पान 2 वर..)

## माढा मतदारसंघातील प्रश्न सोडविण्यासाठी रोहित मोरे निवडणूक रिंगणात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** माढा लोकसभा मतदारसंघात कृषी विकास, पाणी, शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मिटला पाहिजे. यासाठी या निवडणुकीत उभा आहे, अशी माहिती अपक्ष उमेदवार रोहित मोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

गेल्या वेळी निवडणूक जाहिरनामातील कश्मिर ३७० कलम, मुलींना ५०% टक्के आरक्षण या मुद्देची भारत सरकारने बरेपैकी अंमलबजावणी केली आहे. ही खरी लोकशाही निवडणूकीची ताकद आहे.

मुळात माढा लोकसभेला नव्याने वर्ष २००९ सालापासून देशात एक वेगळी ओळख झाली आहे. खूप मोठी संधी मिळून १५ वर्षे पूर्ण झाली पण केंद्रीय पातळीवरील योजनांचा विकास, जनतेचे शेतजमिनी, तळागाळापर्यंत पोहोचला नाही. गांवा-गावांतील लोक मतदार पाण्यासाठी मतदार पाण्यासाठी मतदानांवर बहिष्कार टाकीत आहेत. जे लोकशाहीला




घातक आहेत. ही माढा लोकसभा निवडणूक तितकी सोपी राहिली नाही. माढा लोकसभा भौगोलिक दृष्ट्या विस्तृत आहे. तसेच ऐन वेळी पक्ष बदल, राजकीय भूमिका बदल, अशा अस्थिरतेमुळे जनता पर्याय शोधत आहे.

यात महागाई, बेरोजगारी, युवकांचे पुणे-मुंबईत होणारे स्थालंतर, गांव युवा वर्ग कुटुंबापासून दूर गेला आहे. शेतीकडे पाणी नसल्यामुळे उत्पन्न घटत आहे. माझे ग्रामीण भागातील महिला सबलीकरण त्यांच्या आर्थिक विकास या मुद्द्यांवर मी निवडणूक प्रचारात जात आहे.पाणी, महागाई, युवा बेरोजगारी, युवकांचे स्थलांतर आर्थिक विकास या सर्व मुद्यांवर निवडणूक लढवत आहे.

माढा लोकसभा मतदारसंघात सलग तिसऱ्यांदा निवडणूक लढवत आहे. भारत देशातील सर्वात महत्त्वाची आणि मोठी ही निवडणूक आहे. माढा मतदारसंघात केंद्रीय योजना तळागाळापर्यंत पोहोचल्या नाहीत. पाणी, महागाई, युवा बेरोजगारी, स्थलांतर या मुद्द्यांवर निवडणूक लढवीत आहे, असे अपक्ष उमेदवार रोहित मोरे यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेस किरण निकम, हर्षद शेख, सोमनाथ गायकवाड, रामकृष्ण मोरे आदी उपस्थित होते.

## भाजपला मतांची किंमत राहिलेली नाही - प्रणिती शिंदे



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भाजपला तुमच्या मतांची किंमत राहिलेली नाही. सोलापूरच्या भाजप खासदारांनी फक्त सत्तेची मजा घेतली. तुम्ही त्यांना खासदार केले. मात्र तुम्हाला त्यांचा काहीही उपयोग झालेला नाही. त्यांनी तुमच्याकडून किमती मतदान घेतले. परंतु, त्यांना आता तुमची आणि तुमच्या मतदानाची किंमत राहिलेली नाही, अशी टीका सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांनी केली आहे.

लोकसभा निवडणूक प्रचाराचा वेग आता वाढू लागला आहे. महविकास आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे या या सध्या गावभेटी दौरे करत आहेत. मंगळवारी त्यांनी अक्कलकोट तालुक्यातील निमगाव, बनजगोळ, भोसगा, तोरणी, संगोगी, हालहली, बिंजगेर गावभेट दौरा केला. यावेळी त्यांनी भाजप सरकारच्या फसव्या धोरणाविरोधात सडकून टीका केली.

यावेळी माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रें, माजी कृषी सभापती मल्लीकार्जुन पाटील, शरद पवार राष्ट्रवादी ता प्रमुख बंदेनवाज कोरबु, काँग्रेस जि कार्याध्यक्ष अश्फाकभाई बळोरगी, माजी सभापती प्रथमेश म्हेत्रे, निमगावचे माजी सरपंच महमंद पठाण, बसवराज नागणसुरे, हुसेनी शेख, अण्णाराव करविर, संजय व्हरकेरी, बाबासाहेब पाटील, माजी सरपंच विश्वनाथ इटेनवरू, प्रविण शटगार, अशोक ढंगापुरे, पिंटु पाटील, श्रीशैल रब्बा, आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

### कर्म बघून मतदान करा

यावेळी पुढे बोलताना प्रणिती शिंदे म्हणाल्या, धर्म बघून मतदान करू नका, कर्म बघून मतदान करा. कारण कर्म महत्वाचे आहे, धर्म महत्त्वाचा आहे पण पूजा करताना, लग्न लावताना, असे प्रणिती शिंदे यांनी यावेळी सांगितले. निवडणुकीच्या वेळी काम महत्त्वाचे आहे. मी पंधरा वर्षांपासून आमदार असून जेव्हा जेव्हा सोलापूर अडचणीत आहे. त्यावेळी मी विधानसभेत आवाज उठवला आहे, असे यावेळी प्रणिती शिंदे यांनी सांगितले.

## खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर हे आपत्कालीन संकट

**अकलूज (विलास गायकवाड):-** खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर हे माढा लोकसभा मतदारसंघातील भाजपने लादलेले, आपत्कालीन संकट असून, मतदार चुकला तर विकासाला मुकला असे यावेळी होणार नाही, आशा वेगवेगळ्या संतप्त भावना सोशल मीडियावर खासदार निंबाळकर यांच्या बद्दल धुमाकूळ घालत आहेत.

खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना, माढा लोकसभा मतदारसंघातील जनतेने, मोठ्या अपेक्षेने व विश्वासाने, माढा लोकसभा मतदारसंघाचा विकास होईल, या उद्देशाने निवडून दिले होते. परंतु खासदार नाईक निंबाळकर यांनी जनतेच्या इच्छा, आकांक्षाचा भंग करून, जनतेच्या भावना दुखावण्याचे पापकर्म केले असल्याचे जनता बोलून दाखवत आहे. ज्याच्या नावाने मंगळसूत्र घातले होते, मतदारांच्या साक्षीने, विकास कामांचा संसार मोठ्या थाटात करेन, असा शब्द दिला होता. परंतु त्या शब्दाला न जागता,भरला संसार सोडून, पाच वर्षात अदृश्य झाले, आणि पाच वर्षानंतर माज्यासारखा संसार कोणीच केला नाही, असे म्हणून पुन्हा मला नांदायचे आहे असे म्हणणे, कितपत योग्य आहे?असे उदाहरण मतदार देत आहेत.

विकासाचे ध्येय गाठण्याची





क्षमता असावी, कार्याची निती स्पष्ट असावी, तर जनतेबद्दल तळमळ असावी, सोबत इच्छाशक्ती आणि आत्मविश्वास असावा.राजकारण करताना, व्यक्तीगत स्वार्थाला मूठ माती देणे अपेक्षित असते असे राजकीय जाणकार बोलून दाखवत आहेत.

सध्या माढा लोकसभा मतदार संघातून प्रचाराचा वणवा पेट घेत आहे.या माढा लोकसभा मतदार संघाच्या सारीपाठावर खा.निंबाळकर विरुद्ध धैर्यशील मोहिते पाटील ही लढाई सुरू झाली आहे.

माढा लोकसभा मतदार संघातील, जनता बोलून दाखवत आहे की, खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी, आम्हाला धोका दिला आहे. बोंब मारत विकास कामे केली असल्याचे सांगून, जनतेला खोटे ठरवत आहेत.यामुळे जनतेच्या मनाचा कौल धैर्यशील मोहिते पाटील यांच्या बाजूने अधिक दिसत आहे.

लहान पणापासून समाजसेवेचा ध्यास घेतलेले, धैर्यशील मोहिते पाटील हे मोठ्या कष्टातून घडलेले नेतृत्व आहे. विजय प्रताप युवा मंच या सामाजिक संघटनेची स्थापना करून, या संघटनेमार्फत अलौकिक समाजकार्याचा ठसा, धैर्यशील मोहिते पाटील यांनी उमटवला आहे. जनतेने त्यांच्या या कार्याची दखल घेत, अकलूजचे उपसरपंच, पुढे सरपंच नंतर माळशिरस पंचायत समितीचे सभापती, पुढे जिल्हा परिषद सदस्य, पुढे जि प विरोधी पक्ष नेते, असे अनेक पदे जनकार्याच्या कर्तुत्वावर पदरी पडले. ही धैर्यशील मोहिते पाटील यांची अत्यंत जमेची बाजु आहे. अहोरात्र जनतेच्या कल्याणासाठी, त्यांच्या विविध प्रश्नांसाठी, झटणारे झगडणारे नेतृत्व म्हणून धैर्यशील मोहिते पाटील यांच्याकडे पाहिले जाते. म्हणूनच मतदारांचा कौल, मोहिते पाटील यांच्या बाजूने दिसत असल्याचे राजकीय जाणकार बोलून दाखवत आहेत.

## भाजपचे सातपुतेंच्या आक्षेपार्ह व्हिडिओंची चौकशी सुरु - जिल्हाधिकारी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** लोकसभा निवडणुकीसाठी दीपक ऊर्फ व्यंकटेश्वरा महास्वामी यांनी सोलापूर मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला होता. पण, त्यापूर्वी त्यांनी अमरावती, नागपूर व विजयपूर येथे देखील अर्ज दाखल केले होते. निवडणूक आयोगाच्या संहितेनुसार एका उमेदवाराला केवळ दोन मतदारसंघातूनच निवडणूक लढविता येत असतानाही त्यांनी प्रतिज्ञापत्रात खोटी माहिती दिली. या प्रकरणी त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला जाईल, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली. दुसरीकडे आमदार राम सातपुतेंच्या आक्षेपार्ह व्हिडिओसंदर्भात दोन तक्रारी प्राप्त झाल्या असून त्याचीही चौकशी होऊन अहवाल निवडणूक आयोगाला पाठविला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

उमेदवारी अर्ज माघारीनंतर आता निवडणुकीच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाच्या तयारीसंदर्भात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी मंगळवारी (ता. २३) पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी ते म्हणाले, आमदार राम शिंदे यांच्या आक्षेपार्ह वक्तव्यासंदर्भात आमच्याकडे दोन तक्रारी प्राप्त झाल्या असून त्याअनुषंगाने तो व्हिडिओ पाहिला जाईल. त्यानंतर त्यासंबंधीचा अहवाल राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी व केंद्रीय



निवडणूक आयोगाला पाठविला जाईल. दुसरीकडे लोकसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल केलेले व्यंकटेश्वरा महास्वामी यांनी प्रतिज्ञापत्रात स्वयंघोषणापत्र देताना त्यात दोनपेक्षा अधिक मतदारसंघात उमेदवारी अर्ज न भरल्याची माहिती खोटी दिली तथा लपविल्याचे निदर्शनास आले आहे. त्यांचा उमेदवारी अर्ज बाद ठरला, पण त्यांनी खोटी माहिती दिल्याबद्दल त्यांच्यावर एफआयआर केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

तसेच माढा लोकसभा मतदारसंघात नोटासह ३३ उमेदवार असल्याने त्याठिकाणी प्रत्येक मतदान केंद्रावर तीन बॅलेट मशिन लागतील तर सोलापूर मतदारसंघातून नोटासह २२ उमेदवार असल्याने प्रत्येक मतदान केंद्रावर दोन बॅलेट मशिन लागतील, असेही त्यांनी सांगितले. मशिनवर संबंधित उमेदवारांची नावे अंतिम करण्याचे काम १ मेपूर्वी पूर्ण होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. पत्रकार परिषदेला निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी, जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के उपस्थित होते.

### आचारसंहिताभंगाच्या १६६ तक्रारी

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सी-विजील या ॲपवर १५२ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यातील ६६ तक्रारीत काही प्रमाणात तथ्य आढळले आहे. त्या तक्रारींचा निपटारा त्या त्यावेळी केला आहे. तर १४ ऑफलाइन तक्रारी प्राप्त झाल्या होत्या, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली. आचारसंहिता भंगाची तक्रार प्राप्त झाल्यानंतर ३० ते ४० मिनिटात त्यावर ॲक्शन घेतली जात असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

### ...तर सहा वर्षे निवडणूक लढविता येणार नाही

निवडणूक आयोगाने ठरवून दिलेल्या नमुन्यात उमेदवारांनी निवडणुकीचा दररोजचा विविध खर्च सादर करणे व अचूक ठेवणे बंधनकारक आहे. खर्च विहित नमुन्यात न ठेवला किंवा तो अपूर्ण आढळल्यास त्याचा अहवाल निवडणूक आयोगाला पाठविला जाईल. त्यात गंभीर त्रुटी असतील तर संबंधित उमेदवारावर सहा वर्षे निवडणूक न लढविण्याची बंदी देखील येवू शकते, असा इशारा जिल्हाधिकाऱ्यांनी दिला आहे.

## निवडणूक कर्तव्यात कसूर, वाहन चालकावर गुन्हा दाखल; निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची कारवाई

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** माढा लोकसभा निवडणुकीत कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी पाटबंधारे प्रकल्पातील चालकावर गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती सहा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी विजया पांगारकर यांनी दिली.

४३ माढा लोकसभा मतदारसंघांतर्गत २५४ माळशिरस अ. जा. विधानसभा मतदारसंघाच्या सर्व शासकीय कार्यालयातील वाहने व वाहन चालकांची सेवा निवडणुकीच्या कामकाजात वर्ग करण्यात आली आहे; परंतु उपविभागीय अधिकारी, पाटबंधारे प्रकल्प अन्वेशन उपविभाग क्र. ४ माचणूर, मुख्यालय माळशिरस या




कार्यालयाकडील वाहन चालक हे निवडणूक कर्तव्यात गैरहजर राहिल्याने निवडणूक कामी अडथळा निर्माण केला.

शासनाचे वाहन चालकाविना उभे राहून खाजगी वाहने भाड्याने घ्यावी लागत होता. संबंधित वाहन चालक यांना कारणे दाखवा नोटीस देऊन हजर होण्यासाठी सांगण्यात आले. त्यानंतरही कर्मचारी हजर झाला नाही.

## फलटणमध्ये रामराजे नाईक निंबाळकर यांचे कुटुंब मोहिते पाटलांच्या प्रचारात!!

**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढा लोकसभा मतदारसंघांमध्ये अकलूज माळशिरस मध्ये आधी ताटातलं वाटीत, वाटीतलं ताटात झालं. आता त्याचंच रिपीटेशन फलटणमध्ये झालं.

माढा लोकसभा मतदारसंघाचे भाजपचे उमेदवार विद्यमान खासदार रणजीत सिंह नाईक निंबाळकर यांच्या विरोधात शरद पवारांच्या राष्ट्रवादीला 'तगडा' उमेदवार मिळत नव्हता त्यामुळे पवारांनी 'चाणक्य खेळी' करत माळशिरस मध्ये ताटातले वाटीत, वाटीतले ताटात करत आपले जुनेच सहकारी विजयसिंह मोहिते पाटील यांच्या कुटुंबाला आपल्या गोटात आणले आणि त्यांचे पुतणे धैर्यशील मोहिते पाटलांना माढाचे तिकीट दिले.

जसा मोहिते पाटलांचा रणजीत सिंह नाईक निंबाळकर यांना विरोध होता, त्यामुळे ते पवारांच्या गोटात गेले, तसाच रामराजे नाईक निंबाळकर जरी अजित पवारांच्या गोटात आले असले, तरी त्यांचा देखील रणजीत सिंह यांना विरोध



होता. त्यामुळे रामराजेंचे कुटुंब फलटणमध्ये धैर्यशील मोहिते पाटलांच्या प्रचाराचा नारळ फोडायला उपस्थित राहिले. रामराजे यांचे चिरंजीव अनिकेत राजे निंबाळकर यांनी स्वतः धैर्यशील मोहिते पाटलांच्या प्रचाराचा नारळ फलटणच्या श्रीराम मंदिरात वाढवला. यावेळी संजीव नाईक निंबाळकर देखील उपस्थित होते. संजीव नाईक निंबाळकर हे अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे फलटण तालुका अध्यक्ष आहेत.

रामराजांचे कुटुंब धैर्यशील मोहिते पाटलांच्या प्रचाराचा नारळ फोडायला उपस्थित राहिल्याने मराठी माध्यमांनी देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्याविरुद्ध फलटणमध्ये बंड झाल्याच्या बातम्या छापल्या. पण प्रत्यक्षात माळशिरस काय किंवा फलटण काय इथे ताटातले वाटीत आणि वाटीत ते ताटातच झाले. कारण मोहिते पाटील काय किंवा रामराजे काय, हे मूळात शरद पवारांचे समर्थक होते.

अजित पवार भाजपच्या सत्तेच्या वळचणीला आल्यानंतर ते अजित पवारांसमवेत (पान 2 वर..)

## संपादकीय

# ईव्हीएम संशयकल्लोळ

जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारतामध्ये निवडणुकीची यंत्रणा पुन्हा एकदा इलेक्ट्रॉनिक्स व्होटिंग मशीनपासून पूर्वीच्या कागदी मतदान प्रक्रियेकडे वळवता येणार नाही, अशा प्रकारचे मत सर्वोच्च न्यायालयाने एका सुनावणीदरम्यान व्यक्त केले असले तरी 'ईव्हीएम'बाबत संशय निर्माण करणारे जे विविध मुद्दे उपस्थित झाले आहेत त्याची दखल सरकारला आणि निवडणूक आयोगाला घेऊन याबाबतचा संशय दूर करावाच लागेल. एका खासगी संस्थेने 'ईव्हीएम'च्या विरोधात जी याचिका दाखल केली आहे त्याची सुनावणी सध्या सर्वोच्च न्यायालयात सुरू आहे आणि या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे ईव्हीएम यंत्रणा रद्द करून कागदी मतदान प्रक्रिया सुरू करण्याच्या विचाराला विरोध दर्शवला आहे. जी यंत्रणा अस्तित्वात आहे तीच अधिक सक्षम आणि संशयरहित कशी करता येईल याकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले आहे. या विषयावरील सुनावणी आज 18 एप्रिल रोजीही पुढे सुरू राहणार आहे आणि त्यानंतर कदाचित सर्वोच्च न्यायालय आपला अंतिम निर्णय देईल. अर्थात यापूर्वीही सर्वोच्च न्यायालयाने ईव्हीएमबाबतचे सर्व आक्षेप फेटाळून लावले आहेत. पण ही सुनावणी यासाठी महत्त्वाची आहे की ईव्हीएमद्वारेच जर मतदान होणार असेल तर ही प्रक्रिया अधिक चांगल्या प्रकारे कशी राबवता येईल याचा विचार या निकालामुळे समोर येऊ शकतो. या सुनावणीमध्ये ईव्हीएमला विरोध करणाऱ्या संघटनेचे प्रतिनिधित्व करणारे वकील प्रशांत भूषण यांनी विविध प्रश्न उपस्थित केले आहेत. ज्यामध्ये सर्वात महत्त्वाचा संशय हा ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट या दोन यंत्रांमध्ये साधला न गेलेला समन्वय आहे. 2019 लोकसभा निवडणुकीमध्ये ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटमधील मतदानाचा जो फरक दिसला होता त्याबाबत निवडणूक आयोगाने अद्यापही कोणता खुलासा केलेला नाही, असा दावा या संस्थेतर्फे करण्यात आला आहे. सध्याच्या नियमाप्रमाणे एका विधानसभा मतदारसंघामध्ये पाच व्हीव्हीपॅट यंत्रांमधील मतांची मोजणी केली जाते आणि त्याची पडताळणी ईव्हीएममधील मतांबरोबर केली जाते. अशा प्रकारची पडताळणी शंभर टक्के केली जावी, अशी मागणी या याचिकाकर्त्यांनी केली आहे. पण निवडणूक आयोगाच्या म्हणण्याप्रमाणे, जर अशा प्रकारे शंभर टक्के पडताळणी करायची असेल तर बारा दिवस मतमोजणी करावी लागेल. सर्वोच्च न्यायालयाने ही दखल घेतली याच कारणाने घेतली आहे आणि कागदी मतपत्रिकांवर जेव्हा मतदान होत होते तेव्हाची परिस्थिती सर्वांनीच लक्षात घ्यायला हवी असे सूचितही केले आहे. याचिकाकर्त्यांचे वकील प्रशांत भूषण यांनी युरोपमधील जर्मनीसारख्या अनेक देशांनी ईव्हीएम बंद करून पुन्हा एकदा कागदी मतदान प्रक्रिया सुरू केल्याचा दाखला दिला आहे. पण सर्वोच्च न्यायालयाने हा दाखला फेटाळून लावून जर्मनी हा खूप छोटा देश असल्यामुळे त्यांना याप्रकारे बदल करणे सहज शक्य आहे; पण भारतासारख्या मोठ्या लोकशाही देशामध्ये एखाद्या यंत्रणेमध्ये मूलभूत बदल करणे अवघड ठरू शकते, असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. भारतामध्ये इलेक्ट्रॉनिक्स व्होटिंग मशीन आणि व्हीव्हीपॅट ही यंत्रे ज्या कंपन्यांमध्ये तयार करण्यात येतात त्या सरकारी कंपन्यांमध्ये सत्ताधारी भाजपचे काही पदाधिकारी संचालक म्हणून काम करत असल्याचा दावाही या सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्यांनी केला आहे. पण सर्वोच्च न्यायालयाने त्या विषयाचीही दखल घेऊन अशा प्रकारची यंत्रांची निर्मिती सरकारी कंपन्यांमध्ये होणेच महत्त्वाचे आहे. खासगी कंपन्यांमध्ये जर हे काम दिले गेले तरीसुद्धा तुम्ही पुन्हा आक्षेप घेऊ शकता याची जाणीवही याचिकाकर्त्यांना करून दिली आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने ईव्हीएम यंत्रणा राहणारच असे सांगून त्यामुळे सुधारणा कशी करता येईल याबाबतच्या सूचना करण्याचे आवाहन केले आहे. या सर्व प्रक्रियेमध्ये पारदर्शकता कशी येईल आणि मतदाराने ज्या उमेदवारा समोरचे बटन दाबले आहे त्या उमेदवारालाच मतदान झालेले आहे याची खात्री मतदाराला होईल हे पाहण्याची जबाबदारी आता निवडणूक आयोगाला घ्यावी लागेल.

ईव्हीएम किंवा व्हीव्हीपॅट या दोन्ही यंत्रांमध्ये एक इलेक्ट्रॉनिक चीप असल्यामुळे त्याची छेडछाड करणे शक्य असल्याचा दावाही याचिकाकर्त्यांनी केला असला तरी सर्वोच्च न्यायालयाने त्यालाही महत्त्व दिलेले नाही. कारण यापूर्वीच निवडणूक आयोगाने अनेक वेळा सर्व राजकीय पक्षांना या चिपशी छेडछाड करून दाखवण्याचे आव्हान दिले आहे. अद्याप कोणालाही अधिकृतपणे तशा प्रकारची छेडछाड करता आलेली नाही. गेल्या कित्येक वर्षांपासून निवडणुकीत पराभव झाल्यानंतर त्याला ईव्हीएम जबाबदार असल्याचे कारण पराभूत उमेदवारांकडून किंवा राजकीय पक्षांकडून नेहमीच पुढे केले जात असल्याने एकदा या विषयाबाबतचा संशय संपवणे गरजेचे आहे. सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीच्या अखेरीस हा संशय संपवण्याच्या दृष्टिकोनातून काही पावले उचलण्याबाबत आदेश दिले जातील, अशी आशा करावी लागेल. फ्री आणि फेअर वातावरणामध्ये निवडणूक व्हावी ही जी अपेक्षा आहे ती अपेक्षा निश्चितच गेल्या काही वर्षांमध्ये पूर्ण झाली आहे; पण अद्यापही ईव्हीएमबाबतच्या संशयाला पूर्णविराम मिळाला नसल्याने विनाकारणच लोकशाही प्रक्रियेबाबत संशय निर्माण होत आहे. खरे तर हा संशय जेव्हा पहिल्यांदा निर्माण करण्यात आला त्यानंतरच व्हीव्हीपॅटची यंत्रणा अस्तित्वात आली. पण ही व्हीव्हीपॅट यंत्रणा शंभर टक्के राबवणे शक्य नसल्यानेच उलट हा संशय अधिकच वाढत आहे. सर्वोच्च न्यायालयाने सूचित केल्याप्रमाणे या सर्व प्रक्रियेमध्ये अधिक पारदर्शकता कशी आणता येईल याचाच विचार आता निवडणूक आयोगाला करावा लागेल. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी संपल्यानंतर सर्वोच्च न्यायालय जो निर्णय देईल तो निश्चितच महत्त्वाचा असेल आणि मतदानासारख्या एका लोकशाही प्रक्रियेतील संशयाला पूर्णविराम देणारा असेल, असे वाटते.

# आला उन्हाळा, तब्येत सांभाळा



**सध्या सर्वत्र तापमान वाढत असून, उष्णतेच्या लाटेकडे दुर्लक्ष करू नये. सामान्य मानवी शरीराचे तापमान 36.4°C °fZ 37.2°C (97.5°F °fZ 98.9°F) दरम्यान असते. उष्माघाताचे गंभीर परिणाम होतात. ते टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी आणि सुरक्षित राहावे. उष्णता, अति उष्णता, उष्माघाताची लाट यापासून बचाव करण्यासाठीच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने देण्यात आलेल्या सूचनांची माहिती या लेखात देण्यात आली आहे.**

### उष्णतेचा आरोग्यावर परिणाम सामान्य लक्षणे

सामान्यतः उष्णतेशी संबंधित (सौम्य ते गंभीर) आजारांमध्ये अंगावर पुरळ (अंगाला टोचणारी उष्णता), सूज (उष्णतेमुळे हात, पाय आणि घोट्याला सूज येणे), पेटके (उष्णतेमुळे स्नायूंमध्ये पेटके), उष्माघात, गोंधळल्यासारखे वागणे, काहीही न सुचणे, उष्णतेमुळे थकवा यांचा समावेश होतो. उष्णतेमुळे हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी, श्वसन, किडनी रोगांसारख्या जुनाट आजारांवरील ताण देखील वाढू शकतो.

### अति उष्णतेमुळे शरीरावर परिणाम करणारी लक्षणे

चक्कर येणे किंवा मूर्च्छा येणे, डोकेदुखी, मळमळ किंवा उलट्या, अति तहान लागणे, अतिशय गडद पिवळ्या लघवीसह लघवीचे प्रमाण कमी होणे, जलद श्वासोच्छवास आणि हृदयाचे वाढलेले ठोके

### उष्माघाताची लक्षणे

डोकेदुखी, ताप, उलट्या, जास्त घाम येणे आणि बेशुध्द पडणे, अशक्तपणा जाणवणे, शरीरात पेटके येणे, नाडी असामान्य होणे यासह प्रौढ व्यक्तिंमध्ये दिशाभूल, गोंधळासह बदललेली मानसिक संवेदना आणि चिडचिड, अॅटॅक्सिया, फेफरे किंवा कोमामध्ये जाणे, गरम, लाल आणि कोरडी त्वचा, शरीराचे तापमान 40त्‍ किंवा 104त्र्‍ धडधडणारी डोकेदुखी ही उष्माघाताची लक्षणे आढळतात. तर मुलांमध्ये आहार घेण्यास नकार, अति चिडचिडेपणा, लघवीचे प्रमाण कमी, तोंड कोरडे पडणे, शुष्क त्वचा आणि अश्रू न येणे / खोल गेलेले डोळे, सुस्ती/बदललेल्या संवेदना, चिंता, चक्कर येणे, मूर्च्छा येणे आणि डोके हलके होणे, जखडणे, शरीराच्या कोणत्याही भागातून रक्तस्त्राव, स्नायू कमकुवत होणे किंवा पेटके येणे, मळमळ आणि उलटी, जलद हृदयाचे ठोके / श्वास घेण्यास त्रास ही लक्षणे आढळतात.

### उपायः
### उष्णतेचा त्रास झालेल्या व्यक्तीची मदत करत असताना या गोष्टींचा अवलंब करावा

संबंधित व्यक्तीला थंड ठिकाणी तातडीने हलवावे. शरीराच्या जास्तीत जास्त भागावर किंवा कपड्यांवर थंड पाण्याचा मारा करावा. शक्य असेल तेवढा वेळ त्या व्यक्तीला वारा घालावा.

### उष्माघाताची लक्षणे आढळल्यास ही काळजी घ्या

व्यक्तीला सावलीच्या ठिकाणी झोपवावे. व्यक्तीचे कपडे सैल करावेत. त्याला द्रव पदार्थ, कैरीचे पन्हे पाजावे. तापमान कमी करण्यासाठी थंड पाण्याच्या पट्टया ठेवाव्यात. बाधित व्यक्तीला तात्काळ जवळच्या आरोग्य केंद्रात घेऊन जावे आणि वैद्यकीय सल्ला घ्या.

### उष्माघाताचा त्रास झाल्यास करावयाचे प्रथमोपचार

त्रास झालेल्या मुलाला/मुलीला लगेच घरात/सावलीत आणावे. संवेदनशील राहून त्यांचे कपडे सैल/ढिले करावेत. नळाच्या पाण्याने ओल्या केलेल्या पट्टया शरीरावर ठेवाव्यात. उलटी होत असल्यास त्यांना एका कुशीवर वळवावे, जेणेकरून ते गुदमरून जाणार नाहीत. हवा येण्यासाठी पंख्याचा वापर करावा. पायांखाली उशी किंवा तत्सम काही ठेवून त्यांना आडवे पडायला सांगावे. मूल जागे असल्यास वारंवार साफ आणि थंड पाण्याचे घोट पाजावेत. मूल बेशुद्ध असल्यास त्यांना खायला / प्यायला काहीही देण्याचा प्रयत्न करू नये.

### उष्माघातापासून बचाव; काय करावे ?

अतिउष्णतेच्या परिस्थितीत सर्वसामान्य जनतेने हायड्रेटेड राहणे गरजेचे आहे. त्यासाठी तहान लागली नसली तरीही जेव्हा शक्य असेल तेव्हा पुरेसे पाणी प्यावे. तसेच प्रवास करताना पिण्याचे पाणी सोबत ठेवावे.

भरपूर ताजे व हलके अन्न खाल्ल्यानंतरच घरातून बाहेर पडावे. फळे आणि सलाड सारखे पचायला हलके असणारे अन्न खावे.

पातळ, सैल, सुती, आरामदायी शक्यतो फिकट रंगाचे कपडे परिधान करावेत. उन्हात बाहेर जाताना डोके झाकावे. टोपी/कपडा/छत्रीचा वापर करावा.

भरपूर पाणी, ओ. आर. एस. पाण्याचे द्रावण, ताक किंवा लस्सी, लिंबूपाणी, कैरीचे पन्हे इत्यादी घरगुती पेय घ्यावे. थोडेसे मीठ घालून फळांचा रस घ्यावा. टरबूज, खरबूज, संत्री, द्राक्षे, अननस, काकडी, कोशिंबिर, इतर स्थानिक उपलब्ध फळे आणि भाज्या यासारख्या उच्च पाण्याचे प्रमाण असलेली हंगामी फळे आणि भाज्या खाव्यात. सूर्यप्रकाशात उन्हात बाहेर जाताना शूज किंवा चप्पल घालावी.

भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या (IMD) वेबसाइट https://mausam.imd.gov.in/वर हवामानाची अद्ययावत माहिती मिळवावी. शक्य तितके चांगल्या हवेशीर आणि थंड ठिकाणी, घरामध्ये, सावलीत राहावे. थेट सूर्यप्रकाश आणि उष्णतेच्या लाटांना अडथळा निर्माण करावा. शक्यतो तुमच्या घराच्या ऊन येणाऱ्या बाजूच्या खिडक्या आणि पडदे दिवसा बंद ठेवा, रात्री थंड हवा येण्यासाठी खिडक्या उघडाव्यात. घराबाहेर जात असल्यास, तुमची बाहेरील कामे दिवसाच्या थंड वेळेपर्यंत म्हणजे सकाळी आणि संध्याकाळी मर्यादित करा. दिवसाच्या थंड वेळेमध्ये बाहेरच्या कामांचे वेळापत्रक किंवा नियोजन करावे. उष्णतेचा त्रास आणि उष्णतेशी संबंधित आजाराचा अति धोका असतो, अशा जोखमीच्या लोकांकडे अतिरीक्त लक्ष दिले पाहिजे. यामध्ये लहान मुले आणि बालके, घराबाहेर काम करणारे लोक, शारीरिकदृष्ट्या आजारी, विशेषतः हृदयरोग किंवा उच्च रक्तदाब, गर्भवती महिला, ज्या लोकांना मानसिक आजार आहे अशा व्यक्तिंचा समावेश होतो.

थंड हवामानापासून उष्ण हवामानापर्यंतच्या भागात प्रवास करणाऱ्यांनी त्यांच्या शरीराला उष्णतेला अनुकूल होण्यासाठी एक आठवडा वेळ द्यावा. उष्ण वातावरणात एक्सपोजर/शारीरिक क्रिया हळूहळू वाढल्याने (10-15 दिवसांपेक्षा जास्त) अनुकूलता प्राप्त होते.

### काय करू नये?


रिकाम्या पोटी उन्हात बाहेर पडू नये. उन्हात अधिक वेळ राहू नये. तिखट मसालेदार आणि शिळे अन्न खाऊ नये. शरीरात पाण्याची कमतरता पडू देऊ नये. ताप आल्यास थंड पाण्याची पट्टी ठेवावी. कूलर किंवा एअर कंडिशनर्समधून थेट उन्हात बाहेर पडू नये.

उन्हात विशेषतः दुपारी 12:00 ते 03:00 दरम्यान बाहेर पडणे टाळावे. दुपारच्या वेळी बाहेर पडताना अति परिश्रमाची कामे टाळावीत. अनवाणी बाहेर जाऊ नये. अल्कोहोल, चहा, कॉफी आणि कार्बोनेटेड शीतपेये किंवा मोठ्या प्रमाणात साखर असलेली पेये टाळावीत, कारण यामुळे शरीरातील द्रवपदार्थ जास्त प्रमाणात कमी होतात किंवा पोटात पेटके येऊ शकतात. पार्क केलेल्या वाहनात लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना एकटे सोडू नये. वाहनातील तापमान धोकादायक ठरु शकते.

शरीराचे तापमान वाढलेले, बेशुद्ध, गोंधळलेले आदी व्यक्ती आपल्या नजरेस आल्यास 108/102 या क्रमांकावर संपर्क साधावा.

स्त्रोत - सार्वजनिक आरोग्य विभाग,
संकलन - जिल्हा माहिती कार्यालय, नाशिक

# जागतिक पुस्तक दिन




आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक पुस्तक दिन म्हणून साजरा केला जातो. विल्यम शेक्सपिअर, मिग्युअल सर्वांटीस, इंका गासीलीसो या जगातील ख्यातनाम व्यक्तींचा या दिवशी मृत्यू झाला त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी युनेस्कोने २३ एप्रिल हा दिवस जागतिक पुस्तक दिन म्हणून घोषित केला. हा दिवस पहिल्यांदा २३ एप्रिल १९२३ रोजी स्पेनमधील पुस्तक विक्रेत्यांनी साजरा केला. स्पेनमध्ये मिगेल डे सर्वांटीसच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा करण्यात आला. त्यानंतर १९९५ मध्ये पॅरिसमध्ये युनिस्कोची सर्वसाधारण सभा झाली ज्यात जगभरातील लेखकांना आदर आणि श्रद्धांजली वाहण्यासाठी आणि पुस्तकांमध्ये रस निर्माण करण्यासाठी जागतिक पुस्तक दिन प्रत्येक वर्षी साजरा केला जाईल असा निर्णय घेण्यात आला. वाचन संस्कृतीच्या चर्चेविना पुस्तक दिन साजरा होऊच शकत नाही चला तर मग वाचन संस्कृती विषयी चर्चा करू आणि पुस्तक दिन साजरा करू. आजच्या मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडियाच्या युगात विद्यार्थ्यांचे वाचन कमी होत चालले आहे. पूर्वी विद्यार्थ्यांमध्ये जशी वाचनाची आवड होती तशी आवड आजच्या विद्यार्थ्यांमध्ये दिसून येत नाही. आजच्या सोशल मीडिया आणि इंटरनेटच्या युगात पुस्तके वाचण्याचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची गोडी कमी होत चालली आहे. साहित्य संमेलनामध्ये पुस्तकांची विक्री कमी होऊ लागली आहे. पूर्वी गजबजणारी वाचनालये आता ओस पडू लागली आहेत. ग्रंथालयातील पुस्तके वर्षानुवर्षे एका जागेवरून हलत नाही. आजची पिढी सोशल मीडियाच्या आहारी गेल्याने पुस्तकांपासून दूर होत चालली आहे. सोशल मीडियाच्या आक्रमणामुळे विद्यार्थी अवांतर वाचन विसरत चालले आहेत. सोशल मीडियामुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. वाचन संस्कृती टिकवण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी पुस्तक दिनासारख्या उपक्रमांचे आयोजन व्हायला हवे. आजच्या युगात ज्ञान ही खूप मोठी शक्ती आहे याचाच आपल्याला विसर पडला आहे. वाचनामुळे आपल्याला इतिहासाचे ज्ञान, वर्तमानाचे भान आणि भविष्याचा वेध घेता येतो. ज्ञान मिळवण्याचे प्रभावी साधन म्हणजे वाचन. सातत्याने वाचन केल्यावर आपली ग्रहण क्षमता आणि स्मरणशक्ती अधिकाधीक सशक्त होऊन बुद्धिमत्ता अधिकाधीक प्रगल्भ होते त्यातून माणसाच्या विचार पातळीचा चोहोबाजूंनी विकास होतो. वाचनामुळेच माणसाच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण होते. वाचनामुळे माणूस सुसंस्कृत होतो. चांगलं वाचल्यावर आणि चांगलं ऐकल्यावर आपले विचार विवेकशील व प्रगल्भ होतात, त्यातून आपली मनोभावना शुद्ध होते. आपली भाषा तसेच वक्तृत्व विकसित होते. वाचनामुळे आपले व्यक्तिमत्व बहरते. वाचन ही जीवनाला उन्नत करणारी बाब आहे यामुळे बुद्धीची मशागत होते. माणसाचे जीवन फुलवण्यात वाचनाचा मोठा वाटा असतो त्यामुळे वाचनाचा छंद जोपासून आपले जीवन समृद्ध करायला हवे. मनावरचा ताण कमी करण्यासाठी पुस्तकांच्या सहवासात रमले पाहिजे. चांगल्या पुस्तकांचा, विचारांचा आपल्या जीवनावर सकारात्मक परिणाम होतो आणि आयुष्याकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन कायमचा बदलून जातो. पुस्तकांमुळे कमकुवत मनाला धीर मिळतो त्यामुळे निराशेच्या गर्तेत अडकलेला माणूस हत्या, आत्महत्या करण्यापासून परावृत्त होतो. आजकालच्या तरुणांना खूप ताण असतो हा ताण कमी करण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे वाचन. डॉ बाबासाहेब आंबेडकर नेहमी म्हणत पुस्तकाने अशक्त मस्तक सशक्त होते आणि सशक्त मस्तक कोणासमोरही डोळे झाकून नतमस्तक होत नसते. स्वामी विवेकानंद, महात्मा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर, भगतसिंग यासारख्या महापुरुषांच्या जीवनाला वाचनामुळेच कलाटणी मिळाली. ऐतिहासिक पुस्तकांमुळे वाचकांच्या मनात राष्ट्रनिष्ठा निर्माण होते. कथा कादंबरी यामुळे वाचकांच्या मनात माणुसकीचा भाव जागृत होतो. काव्य वाचनातून आपल्या मनात संवेदनशीलता निर्माण होते. थोरांची चरित्रे वाचून प्रेरणा मिळते. वर्तमानपत्र वाचल्याने सामाजिक जाणिव निर्माण होते. एकूणच वाचनामुळे माणूस सर्वगुणसंपन्न होतो. त्यांच्यात नैतिक मूल्यांची रुजवण होते. आज वाचनाअभावी समाजातून नैतिक मूल्ये हरवत चालली आहे. त्यामुळे नव्या पिढीने पुन्हा एकदा वाचन संस्कृतीकडे वळणे ही काळाची गरज आहे. आपल्या आणि समाजाच्या भल्यासाठी वाचन संस्कृती टिकवायलाच हवी. वाचाल तर वाचाल या उक्तीप्रमाणे तरुण पिढीला वाचवायचे असेल तर त्यांच्यात वाचन संस्कृती रुजवायलाच हवे, त्यासाठी पुस्तक दिनासारखे उपक्रम नक्कीच फायदेशीर ठरतील.



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# सोलापूर जिल्ह्याला अवकाळी पावसाचा झटका!

## 2 व्यक्तींसह 72 जनावरांचा मृत्यू; जिल्ह्यात 2552 हेक्टरवरील पिकांचेही नुकसान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे दोन व्यक्तींसह ७२ जनावरांचा मृत्यू झाला आहे. मृत व्यक्तीला प्रत्येकी चार लाखांची मदत दिली जाणार असून त्यासाठी शवविच्छेदन अहवाल यायचा बाकी आहे. तर मृत जनावरांसाठीही नियमानुसार भरपाई दिली जाणार असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी दिली.

चालू महिन्यात (एप्रिल) जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे दोन व्यक्तींचा मृत्यू झाला आहे. शासनाने नैसर्गिक आपत्तीच्या काळात निगेटिव्ह ग्रॅण्डमधून निधी वितरित करण्यासंदभार्तील आदेश दिले आहेत. त्यामुळे अवकाळी पावसात मृत व्यक्ती व जनावरांसाठी नुकसान भरपाई मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पण, शेतीच्या नुकसानीचे पंचनामे अजून पूर्ण झालेले नाहीत. कृषी विभागाकडील प्राथमिक अंदाजानुसार जिल्ह्यातील अडीच हजार हेक्टरवरील पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यात केळी, आंबे, द्राक्ष अशा पिकांचा मोठ्या प्रमाणावर समावेश आहे. दरम्यान, पंचनामे वेळेत पूर्ण करून तातडीने अहवाल देण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधितांना दिले आहेत.

पंचनामे पूर्ण झाल्यावर नेमके किती नुकसान झाले आहे, त्याचा अहवाल शासनाला सादर केला जाणार आहे. त्यानंतर शासनाकडून संबंधितांना भरपाई मिळणार आहे. शासनाकडून कधीपर्यंत भरपाई मिळेल हे स्पष्टपणे आता कोणीही सांगू शकत नाही, दुसरीकडे सोलापूरसह राज्यातील २१ जिल्ह्यांमधील एक लाख हेक्टरला अवकाळीचा फटका बसला असून त्याचे पंचनामेही पूर्ण झालेले नाहीत. तोपर्यंत मृत जनावरांसाठी व्यक्तींच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई तातडीने वितरीत केली जात आहे.



**पंचनामे काही दिवसांत पूर्ण होईल**

अवकाळी पावसामुळे प्राथमिक अंदाजानुसार जिल्ह्यातील दोन हजार ५५२ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. तर दोन व्यक्तींचा आणि ७२ लहान-मोठ्या जनावरांचाही मृत्यू झाला आहे. मृत व्यक्ती व जनावरांसाठी लवकरच मदत वितरित केली जाईल. शेती नुकसानीचे पंचनामे काही दिवसांत पूर्ण होऊन त्याचा अहवाल शासनाला सादर होईल.
- **मनीषा कुंभार,** निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर

पान १ वरून

## राष्ट्रवादी बालेकिल्ल्यातून लीड...

मताधिक्य देण्यासाठी नेटाने प्रयत्न सुरू केले आहेत. उमेदवारी नाकारल्यामुळे नाराजीच्या अवस्थेत असलेल्या संजय क्षीरसागर यांनी मतदारसंघातील काही गावांचा दौरा करून स्वतःचा सवता सुभा निर्माण करण्यासाठी प्रयत्न सुरू केल्याचे जाणवत होते. त्यामुळे भाजपच्या तंबूत यापूर्वीच असलेली अस्वस्थता आणखी वाढून संजय क्षीरसागर यांनी भाजपा मधून बाहेर पडण्याचा निर्णय दोन दिवसांपूर्वी पत्रकार परिषदेमध्ये जाहीर केला. त्यामुळे मोहोळ तालुक्याच्या राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल होत असून माळशिरसच्या जानकरांच्या पॅटर्नुसार संजय क्षीरसागर यांनी तुतारी सोबत जाण्याचा तर निर्णय घेतला नाही ना अशा चर्चांना उधाण आले आहे.

## फलटणमध्ये रामराजे नाईक निंबाळकर...

आले होते. पण भाजपमध्ये आपली डाळ शिजवून आपल्या मतानुसार माढाची उमेदवारी ठरत नसल्याचे पाहून ते शरद पवारांच्या गोटात पुन्हा निघून गेले. यापेक्षा माढात फारसे काही वेगळे घडलेले नाही. पण एवढे होऊनही रामराजे अद्याप अधिकृतरित्या अजित पवारांच्या गोटात आहेत.

# सोलापूर लोकसभा निवडणुकीच्या प्रचार यंत्रणेसाठी आज परिचारक गटाची बैठक

**मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):-** मंगळवेढा पंढरपूर विधानसभा मतदारसंघातील सोलापूर लोकसभा महायुतीचे उमेदवार राम सातपुते यांच्या प्रचाराचे नियोजन करण्यासाठी मंगळवेढा तालुक्यातील प्रमुख कार्यकर्ते व पदाधिकारी यांचे मंगळवेढा येथील खोमनाळ रोडवरील समर्थ लॉन येथे आज मंगळवार दिनांक 23 एप्रिल रोजी सकाळी 10 वाजता विचार विनिमय बैठक आयोजित केल्याची माहिती श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याचे संचालक औदुंबर वाडदेकर यांनी दिली. या बैठकीसाठी माजी आमदार प्रशांतराव परिचारक सोलापूर लोकसभा माहितीचे उमेदवार राम सातपुते यांच्यासह कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.



### सोलापूर लोकसभा मतदारसंघात मोठा ट्विस्ट

संपूर्ण देशात लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण आता चांगलेच तापू लागले आहेत. विविध पक्षांकडून प्रचाराला जोर दिला जात आहे. तसेच प्रचारातील रंगत आता वाढत आहे. पहिल्या टप्प्याचे मतदान अलीकडेच पूर्ण झाले. तर दुसऱ्या टप्प्यातील मतदान येत्या शुक्रवारी होणार आहे.

दरम्यान, सोलापूर मतदारसंघातील वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार राहुल गायकवाड यांनी निवडणुकीतून माघार घेतली आहे. गायकवाड यांनी लोकसभा निवडणुकीतून माघार घेतल्यामुळे आता सोलापूरमध्ये काँग्रेसच्या उमेदवार आमदार प्रणिती शिंदे आणि भाजपाचे उमेदवार राम सातपुते यांच्यात थेट लढत होणार आहे. वंचित आघाडीचे प्रमुख अॅड. प्रकाश आंबेडकर यांनी सोलापूर मतदारसंघातून अक्कलकोटचे गायकवाड यांना उमेदवारी जाहीर केली होती. सोलापूरसाठी गायकवाड यांची उमेदवारी नवखी होती. त्यावेळी त्यांच्या उमेदवारीची खूप चर्चा झाली होती. गायकवाड यांचा उमेदवारी अर्ज छाननीत वैध ठरला होता. मात्र, त्यानंतर त्यांनी अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी आज सोलापूर मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. दरम्यान, गायकवाड यांच्या माघारीमुळे सोलापूर मतदारसंघात आता काँग्रेसच्या प्रणिती आणि भाजपचे सातपुते यांच्यात थेट लढत होणार आहे.

### वात्रटिका
## वाय प्लस सुरक्षा

वीर धनुर्धर पाथार्साठी
चक्र सुदर्शन घेतले हाती...
त्यासाठी असावी हाती सत्ता
आणि राजकारण्याशी नाती...
ध्यानी नाही मनी नाही
त्याला म्हणे भिती आहे...
वाय प्लस सुरक्षेचा खर्च
विचारू नका किती आहे...

**हणमंत पडवळ,**
उस्मानाबाद,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः अॅड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या वतीने जागतिक पुस्तक दिन साजरा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ग्रंथ व पुस्तके हे माणसे घडविण्याचे काम करतात. सवानीं ग्रंथ अथवा पुस्तके सातत्याने वाचली पाहिजेत. वाचनाने माणसे सुसंस्कृत, प्रगल्भ होत असतात. असे जिल्हा माहिती सुनिल सोनटक्के यांनी सांगितले.

जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात आज जागतिक पुस्तक दिनानिमित्त ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात होते. ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हा माहिती अधिकारी सोनटक्के यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाचे प्रमोद पाटील, प्रदीप गाडे तसेच असंख्य वाचक वर्ग उपस्थित होते. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी सोनटक्के म्हणाले, वाचन माणसाला समृद्ध करतेच शिवाय काय चांगले काय वाईट याची समजही वाचनातून प्राप्त होत असते. संवेदनशीलता आणि आत्मविश्वास देखील वाचनातून प्राप्त होतो. कोणत्याही व्यक्तीला यश प्राप्तीसाठी पुस्तकांचा फार मोठा फायदा होतो. ग्रंथ प्रदर्शनामुळे वाचकांना नवीन ग्रंथ, पुस्तके पहावयास मिळतात. त्यातुनच वाचनाची आवड निर्माण होते. त्याचबरोबर वाचक वर्ग वाढवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# बार्शी येथे तीस वर्षापूर्वीच्या वडाच्या झाडाचे केले पुनर्रोपण

## वृक्ष संवर्धन समितीच्या प्रयत्नांना यश



**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** मागच्या आठवड्यात झालेल्या वादळात टेलिफोन नगर उपळाई रोड येथील 30 वर्षा पूर्वीचे वडाचे झाड उपटून पडले होते. ही गोष्ट पक्ष संवर्धन समितीच्या सदस्यांना कळाली ते झाड जगू शकेल का यासाठी विविध तज्ञांचे मार्गदर्शन घेण्यात आले.परंतु ज्या भागात ते होते तेथील जमिनीच्या कठीनते मुळे तिथे ते लावणे अवघड होते त्यामुळे दुसऱ्या ठिकाणी ते पुनरोपन करण्याचे ठरवले. त्यासाठी योग्य जागा म्हणजे शासकीय आयटीआय समोरील मैदान निवडण्यात आले.परंतु हे आवाढव्य झाड त्या ठिकाणी नेहने आणि ते रोपण करणे ही सोपी गोष्ट नव्हती.

परंतु वृक्ष संवर्धन समितीच्या सदस्यांनी मोठ्या कष्टाने उत्कृष्ट नियोजन करून ते झाड शासकीय खुल्या जागेत नेऊन यशस्वीरित्या लावले. या कार्यात त्यांना पैकेकर कन्स्ट्रक्शनचे प्रशांत पैककर, मंदार कुलकर्णी, बार्शी नगरपालिकेतील कारकर पाटील, गौतम आठवले यांनी मोठी मदत केली.

रविवारी सकाळी नऊ वाजता सुरू झालेले हे काम सायंकाळी आठ वाजता पूर्ण झाले. सुरुवातीला एकीकडे पडलेल्या झाडांच्या फांद्या कट करण्यात येत होत्या तर दुसरीकडे जीसीपीच्या साह्याने खड्डा घेण्याचे काम सुरू होते. खड्डा घेतल्यानंतर त्या खड्डयात सुरुवातीला थोडी काळी मती टाकून दोन टँकर पाणी सोडून जमिनीतील उष्णता कमी करण्यात आली. त्यानंतर टेलिफोन नगर येथील कट केलेले झाड क्रेनच्या सहाय्याने मोठ्या ट्रकमध्ये ठेवण्यात आणि ते झाड शासकीय आयटीआय समोरील खुल्या जागेत आणण्यात आले. यावेळी छोटे रस्ते तसेच रस्त्यावरील वायरिंग यामुळे वृक्ष संवर्धन समितीच्या सदस्यांना मोठी कसरत करावी लागली. त्यानंतर क्रेनच्या साह्याने ते झाड खड्डयात ठेवण्यात आले व जेसीबीच्या साह्याने सुरुवातीला काळी माती लोटून त्यानंतर मुरूम खडक खत देखील झाडाच्या बुंध्यापाशी टाकण्यात आले. त्यानंतर आणखीन एक टँकर पाणी झाडाला दिले आणि अशा रीतीने संपूर्ण दिवसाच्या अखंड परिश्रमानंतर वसुंधरा दिनाच्या पूर्व संध्येला वसुंधरे चे एक मूल वाचवण्यात वृक्ष संवर्धन समितीच्या सदस्यांना यश आले. त्यानंतर तेथे जमलेल्या वृक्षप्रेमींनी आणि वृक्ष संवर्धन समितीच्या सदस्यांनी आनंदोत्सव साजरा केला.

यावेळी बोलताना वृक्ष संवर्धन समितीचे राहुल तावरे यांनी सांगितले की या झाडाला येणारे सहा महिने देखरेख करून जोपासण्यात येणार आहे. त्यासाठी योग्य खते तसेच औषधे देखील काही दिवसाच्या अंतराने या झाडांना देण्यात येणार आहेत.

हे कार्य यशस्वी करण्यासाठी राहुल तावरे, उमेश काळे,डॉ. सचिन चव्हाण, महेश पायघन, दीपक जाधव, महेश बकशेट्टी, सागर बिडवे, प्रज्वल मोरे, आनंद धुमाळ, रोहन अवताडे, संतोषकुमार गायकवाड, शेख सर, अक्षय भोईटे, गणेश घोलप, व्यंकटेश गायकवाड तसेच पैकेकर कन्स्ट्रक्शनचे कामगार आदींनी परिश्रम घेतले

# भीम जयंती निमित्त शनिवारी वरळेगावात जंगी कुस्त्यांचे आयोजन

## महिला मल्लांसाठीही होणार स्पर्धा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दक्षिण सोलापूर तालुक्यातील वरळेगाव येथे क्रांती बहुउद्देशीय मागासवर्गीय सामाजिक संस्थेच्या वतीने शनिवार दि. 27 एप्रिल 2024 रोजी खुली आणि महिलासाठीही जंगी कुस्ती स्पधेर्चे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष किशोर चौधरी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शनिवारी दुपारी 4 वाजता वरळे गावातील नागा हक्के यांच्या शेतात ही स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेत नामवंत मल्लांच्या कुस्त्या होणार आहेत. प्रथम बक्षीस 31 हजार रुपये, द्वितीय 21 हजार रुपये, तृतीय 11 हजार रुपये आणि प्रत्येकी गदा असे स्वरूप आहेत. विशेष करून महिला मल्लांच्याही कुस्त्या होणार आहेत. महिलांच्या स्पधेर्साठी प्रथम अकरा हजार रुपये, द्वितीय सात हजार रुपये, तृतीय पाच हजार रुपये आणि ट्रॉफी असे बक्षीसाचे स्वरूप आहे. जास्तीत - जास्त स्पर्धकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन यावेळी अध्यक्ष किशोर चौधरी यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस श्रीमंत हक्के, सखाराम वाघ, शत्रगुण माने, कल्लप्पा चतुर्भुज, राम सलवदे आदी उपस्थित होते.

# लोकमंगल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या वर्धापन दिनानिमित्त शिव व्याख्यानमालेचे आयोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** लोकमंगल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या 26 व्या वर्धापन दिनानिमित्त शिव व्याख्यानमाला, रक्तदान शिबिर आणि सत्यनारायण महापूजा आयोजित करण्यात आली असल्याची माहिती बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेशसिंह बायस यांनी पत्रकार परिषदेत दिली.

लोकमंगल सहकारी बँकेचा दि. 28 एप्रिल 2024 रोजी 26 वा वर्धापन दिन साजरा करण्यात येत आहे. लोकमंगल समूहाचे संस्थापक आ. सुभाष देशमुख यांनी सन 1998 मध्ये अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर या बँकेच्या शुभारंभ केला. "अखंड गतीतून सार्थकता" हे ब्रीद घेऊन ही बँक कार्यरत आहे. या वर्धापन दिनानिमित्त दि. 26 व 27 एप्रिल 2024 रोजी सायंकाळी 5.55 वाजता शिवस्मारक सभागृह, शिंदे चौक येथे दोन दिवसीय शिव व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. पहिल्या दिवशी शुक्रवारी "संदीप वैभव आणि कविता" या विषयावर संदीप खरे आणि वैभव जोशी हे कविता सादरीकरण करणार आहेत. शनिवारी "चला शिवसंस्कार जपूया !" या विषयावर डॉ. शिवरत्न शेटे हे व्याख्यान देणार आहेत. लोकमंगल बँकेच्या मुख्यालयात शनिवार दि. 27 एप्रिल 2024 रोजी सकाळी 10 वाजता सत्यनारायण महापूजा व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. बँकेचे सभासद, ठेवीदार, खातेदार, कर्जदार व हितचिंतकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन राजेशसिंह बायस यांनी केले आहे.

लोकमंगल बँकेच्या अद्यावत डेटा सेंटरसह प्रधान कार्यालय, सात शाखांबरोबरच 7 बिजनेस करस्पॉन्डन्स सेवा केंद्र सेवा देत आहेत. 553 कोटीच्या ठेवी बँकेकडे आहेत तर 344 कोटींचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. सन 2023 या आर्थिक वर्षात बँकेला 4 कोटी 8 लाख रुपये इतका निव्वळ नफा झाला आहे. लेखापरीक्षणात बँकेस "अ" वर्ग दर्जा मिळाला आहे.

या पत्रकार परिषदेस संचालक अशोक मादगुंडी, प्रल्हाद कांबळे, दिपाली कोठारी आदी उपस्थित होते.

# महाराष्ट्र दिनी मतदार जनजागृतीसाठी मुंबई उपनगर जिल्ह्यातर्फे सायकल रॅली

**मुंबई (कटूसत्य वृत्त):** लोकसभा निवडणुकीसाठी मुंबई उपनगर जिल्ह्यातील मुंबई उत्तर, मुंबई उत्तर पश्चिम, मुंबई उत्तर पूर्व, मुंबई उत्तर मध्य या मतदारसंघात 20 मे रोजी मतदान होणार आहे. मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पुढाकाराने महाराष्ट्र दिनी म्हणजेच 1 मे रोजी सकाळी 6.30 वाजता सायकल रॅली काढण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांनी दिली आहे.

भारत निवडणूक आयोग, बाईक्स मुंबई, मुलुंड रायडर्स यांच्या संयुक्त विद्यमाने आणि मुंबई उपनगर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या पुढाकाराने ही सायकल रॅली काढण्यात येईल. मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालय, वांद्रे (पूर्व), मुंबई येथून सायकल रॅलीला सुरवात होईल. त्यानंतर ही रॅली वेगवेगळया मार्गाने दक्षिण मुंबई, एनसीपीए, अंधेरी क्रीडा संकुल, बोरीवली येथील प्रबोधन ठाकरे नाट्यगृह, मुलुंडचे कालिदास नाट्यमंदिर या चार ठिकाणी रॅलीचा समारोप होईल. लोकसभा निवडणूक हा लोकशाहीचा राष्ट्रीय महोत्सव आहे. या महोत्सवात अधिकाधिक मतदारांनी मतदान करून आपले कर्तव्य पार पाडावे म्हणून 'स्वीप' उपक्रमाच्या माध्यमातून जनजागृतीचे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

# मुंबई उपनगर जिल्हा माध्यम कक्षास माध्यम प्रतिनिधींनी दिली भेट



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 निमित्त मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालय, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे कार्यान्वित करण्यात आलेल्या माध्यम कक्ष आणि माध्यम प्रमाणन व सनियंत्रण कक्षास विविध माध्यमांच्या प्रतिनिधींनी भेट देवून पाहणी केली.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि निवडणूक उपजिल्हाधिकारी तेजस समेळ यांच्या सहकार्याने माध्यम कक्ष तथा माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समिती गठित करण्यात आली आहे. या समितीत माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील वरीष्ठ सहाय्यक संचालक तथा 'दिलखुलास' 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमाचे समन्वय अधिकारी केशव करंदीकर हे मुख्य समन्वयक आहेत.

यावेळी माध्यम प्रतिनिधींनी भेट देवून माध्यम कक्षाच्या कामकाजाची माहिती जाणून घेतली. मुख्य समन्वयक श्री. करंदीकर यांनी माध्यम कक्षाचे कामकाज, माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीचे कामकाज याविषयीची सविस्तर माहिती माध्यम प्रतिनिधींना दिली. यावेळी टीव्ही मॉनिटरिंग, सोशल मीडिया मॉनिटरिंग आदींची माहिती त्यांनी जाणून घेतली.

माध्यम कक्षाचे चाललेले कामकाज, प्रशासन आणि प्रसारमाध्यमे यामध्ये दुवा म्हणून माध्यम कक्षाकडून मिळणारी माहिती सर्व प्रसारमाध्यम प्रतिनिधींना उपयुक्त ठरत असल्याची प्रतिक्रिया माध्यम प्रतिनिधींनी दिली.

# लोकसभा निवडणुका सुरळीतपणे पार पाडण्यासाठी राजकीय पक्षांनी सहकार्य करावे - विकास पानसरे




**मुंबई** (कटूसत्य वृत्त):- लोकसभा सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी जिल्हा निवडणूक यंत्रणा सज्ज आहेत. भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांचे पालन करून जिल्हा प्रशासनाला राजकीय पक्षांनी सहकार्य करावे, असे आवाहन कोकण विभागाचे अपर विभागीय आयुक्त तथा 30-मुंबई दक्षिण मध्य लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी विकास पानसरे यांनी केले.

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय पक्ष, उमेदवारांनी पालन करावयाचे नियमांसह इतर आवश्यक बाबींची माहिती देण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी विकास पानसरे यांच्या अध्यक्षतेखाली नोंदणीकृत राष्ट्रीय व राजकीय पक्ष प्रतिनिधींची बैठक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीस सहायक निवडणूक निर्णय अधिकारी बप्पासाहेब थोरात, समन्वय अधिकारी तुषार मठकर, वरिष्ठ लेखाधिकारी राजू रामनानी, उपसंचालक (वित्त) चित्रलेखा खातू यांच्यासह विविध नोंदणीकृत राजकीय पक्षाचे प्रतिनिधी उपस्थित होते. निवडणूक प्रक्रीया आणि व्यवस्थापनाबद्दल माहिती देताना श्री.पानसरे म्हणाले, 30-मुंबई दक्षिण मध्य लोकसभा मतदार संघाची निवडणूक पाचव्या टप्प्यात होत असून 26 एप्रिल रोजी निवडणूकीची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्या दिवसापासून नामनिर्देशन पत्रे स्विकारण्यात येतील. नामनिर्देशन पत्रे दाखल करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, निवडणूक खर्च नोंदी यासह इतर महत्वाच्या बाबींविषयी यावेळी श्री. पानसरे यांनी मार्गदर्शन केले. भारत निवडणूक आयोगामार्फत देण्यात आलेल्या निदेर्शांचे आणि आदर्श आचारसंहितेचे सर्वांनी पालन करावे. नामनिर्देशन पत्रे भरण्यापासून प्रचार विषयक नियम, निवडणूक खर्च सादर करण्याबाबतचे नियम आदी सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

सहायक निवडणूक निर्णय अधिकारी श्री.थोरात यांनी टपाल मतपत्रिकाच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची सविस्तर माहिती दिली. श्रीमती खातू यांनी उमेदवारांनी निवडणूक खर्चाविषयी ठेवण्याच्या नोंदी आणि त्याबाबतच्या नियमांविषयी माहिती दिली.

## कटूसत्य शब्दकोडे क्र. ५७



**उभे शब्द :** १) भाजपच्या गत सरकारच्या काळातील एक माजी केंद्रीय मंत्री २) विदेशी जातीचे एक मद्य ३) उजेड ४) कश उलट लिहा ५) आ. बच्चू कडू यांचा जिल्हा ६) मुलगी ग्रामीण भाषेत, तलाव (इंग्रजीत) ७) देवाचे नाव घेवून वाहिलेल्या आणाभाका १२) याच्यावर भाकरी भाजतात १४) ज्वारीची वैरण १६) दम उलट लिहा १८) श्रीविष्णूचा एक अवतार २०) नातेवाईक २२) मराठी अक्षरांची वर्णमाला २४) समोरासमोर झालेली दृष्टीभेट २६) निवडणुकीतील व्होट (मराठीत) २८) वाईट, डावा ३०) मनाने मजबूत, खंबीर ३२) एखाद्या गोष्टीचा ध्यास, आशा ३३) आकाश, नभ ३४) वायू, पवन ३५) भगवान शंकराच्या पिंडीवर या वृक्षाची पाने वाहतात ३६) टाईम (मराठीत) ३७) समर्थ रामदास स्वामी लिखित ग्रंथ ३९) महाराष्ट्रालगतचे एक राज्य ४१) वतनाचा मालक ४३) या आजारात डोळे पिवळे दिसतात ४४) वर्तवलेले भविष्य ४५) एक म्हण-बडा घर *** वासा ४६) कालच्या अगोदरचा दिवस ४८) मार्ग, पथ ५०) गाड्यावरील फेमस खाद्यपदार्थ-**पाव ५२) कपडे धुण्याची एक पावडर, साबण

**आडवे शब्द :** १) देशातील विस्ताराने मोठे असलेले राज्य
५) युपीतील समाजवादी पार्टीचे युवा नेते - **** यादव
८) याचे कणीस भाजून खातात ९) शपथ (हिंदीत) १०) बशीचा जोडीदार
११) शिजवलेला तांदूळ १३) संशय (हिंदीत) १५) श्रीविष्णूचा अवतार, सीतापती
१७) पक्ष्यांचा समूह १९) पाठविणे, *** करणे
२१) धातूच्या या पात्रात जेवण भरून घेतात २३) मुख, तोंड
२५) खा. सुप्रिया सुळे यांचा मतदारसंघ २७) युवक, लष्करातील सैनिक
२९) नशीब (इंग्रजीत) ३१) पिकांच्या वाढीसाठी हे वापरतात, पत्र (हिंदीत)
३१) निवांत, *** हराम है ३३) लहान बालकांची बालवाडी ३५) डाळीचे पीठ
३७) दबाव, नियंत्रणासाठी ठेवलेले वजन ३८) एक प्रार्थना - ** तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे ३९) उद्या (हिंदीत) ४०) समीप, नजीक ४२) राज्य चालविणारे शासन, गव्हर्मेंट (मराठीत) ४४) आपला देश
४५) पिंजऱ्यात पाळला जाणारा पक्षी ४७) जुनाच्या विरूध्दार्थी शब्द ४९) एक भारतीय फलंदाज-शिखर *** ५१) नवे कोरे, न चुरगळलेले ५३) गर्द अशी झाडी, विरळच्या विरूध्दार्थी शब्द ५४) आ. जयंत पाटील यांचा मतदारसंघ
५५) तीन आणि एक मिळून होणारी संख्या


## शब्दकोडे क्र. ५६ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| न | वा | जु | द्दि | न | | मा | ढा | | रा | फे | ल |
| ग | | गा | | ज | वा | न | | ना | व | | व |
| र | ब | र | | र | ई | स | | म | | कं | क |
| | डी | | ना | | | | अं | दा | ज | | र |
| | शे | त | क | री | का | म | गा | र | प | क्ष | |
| ता | प | ट | | | र | | र | | | मा | ती |
| स | | क | | स | खा | | की | | न | | स |
| गा | | रे | स | | ना | सा | | मा | व | शी | |
| व | ग | | रा | ज | | ग | ड | क | री | | |
| | जा | य | फ | ळ | | र | ग | ड | | पा | व |
| दा | न | व | | गा | र | | र | हा | ट | | र |
| र | न | | स | व | त | | | ड | र | का | ळी |


# Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**
**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, नागाळा पार्क (कोल्हापूर).**
-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
9822964815 / 9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण




**विकणे आहे**
सोलापूर शहरातील चांगल्या लोकवस्तीतील ST स्टॅन्ड व रेल्वे स्टेशन जवळ आवंतीनगर, शरद पवार शाळेजवळ, लोकमंगल ऑक्सिपार्क, येथील अ विंग मधील ७०४ नंबरचा फ्लॅट विकणे आहे.
**संपर्क : 9881361260**

**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**

दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...

व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटस्अॅप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

**R.K कन्स्ट्रक्शन्स्**

संपर्क : इंजि. स्वप्निल पोपट कदम M.E. (Structure) B.E. (Civil)
Mo. 9552547272, 8788832033


**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

